SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३१९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.३० जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## जंतर-मंतरवरील आंदोलनाला विदर्भ राज्य आंदोलन समितीचा जाहीर पाठिंबा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** नवी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने 'अभिजित दीपके' यांच्या अध्यक्षतेखाली सुरू असलेल्या आंदोलनास तसेच 'सोनम वांगचूक' यांच्या आमरण उपोषणाला विदर्भ राज्य आंदोलन समिती (विराआस)च्या शिष्टमंडळाने भेट देऊन जाहीर पाठिंबा व्यक्त केला.

या शिष्टमंडळात विराआसचे अध्यक्ष व माजी आमदार ॲड. वामनराव चटप, युवा आघाडी प्रांताध्यक्ष मुकेश मासुरकर, पूर्व विदर्भ विभागाध्यक्ष अरुणभाऊ केदार, पश्चिम विदर्भ विभागाध्यक्ष प्रा.डॉ.पी.आर. राजपूत, प्रचार प्रमुख तात्यासाहेब मत्ते तसेच कोअर कमिटी सदस्य श्रीमती पद्माताई राजपूत यांचा समावेश होता.

यावेळी ॲड. वामनराव चटप यांनी उपोषणस्थळी उपस्थितांना संबोधित करत आंदोलनाच्या उद्दिष्टांचे समर्थन केले. लोकशाही मार्गाने जनहितासाठी सुरू असलेल्या या लढ्याला विदर्भ राज्य आंदोलन समितीचा ठाम पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनाला व्यापक जनसमर्थन मिळावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# नसरापूरमधील नराधमाला कोर्टाकडून मृत्युदंड;
## सुप्रिया सुळेंनी केली आता कठोर मागणी





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, पुणे :** नरसापूर येथील चिमुरडीच्या अत्याचार आणि हत्या प्रकरणातील आरोपीला कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून प्रतिक्रिया उमटत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या निकालाचे स्वागत करत कोर्ट, पोलीस आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

हा देश संविधानाच्या चौकटीत चालतो, त्यामुळे या नराधमाला भर चौकात लवकरात लवकर फाशी दिली पाहिजे, अशी कठोर मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे. तसेच, या नराधमाला भर चौकात ठेचून काढलं पाहिजे, या मुख्यमंत्र्यांच्या विधानाचा दाखला देत त्यांनी या प्रकरणात कुठलेही राजकारण झाले नसल्याचे स्पष्ट केले.

**'मुख्यमंत्र्यांनी शब्द पाळला, राजकारण केलं नाही'**

सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, ज्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडली, त्याच दिवशी आम्ही ठरवलं होतं की या प्रकरणात राजकारण आणायचं नाही. आम्ही या संदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती आणि त्यांनी आम्हाला आरोपीला कठोर शिक्षा करून देण्याचा शब्द दिला होता. मुख्यमंत्री भाजपचे आहेत आणि मी राष्ट्रवादीची आहे, पण त्यांनी दिलेला शब्द पाळला. मुख्यमंत्र्यांनी स्वतः कोर्टाला विनंती केली होती की, या नराधमाला भर चौकात ठेचून काढलं पाहिजे. आम्ही मुख्यमंत्री, न्यायालय आणि पोलिसांचे मनापासून आभार मानतो.


**'भर चौकात फाशी द्या, दया-माया चालणार नाही'**

न्याय देण्याच्या प्रक्रियेतील एक मोठा टप्पा आपण पार पाडला असल्याचे सांगत सुळे म्हणाल्या, आता नसरापूर प्रकरणातील आरोपीने कुठलीही दया-माया करण्याची मागणी केली, तरी ती अजिबात चालणार नाही. अशा नराधमांना कोणतीही माफी नसावी.

**फास्ट ट्रॅक कोर्टामुळे न्याय लवकर मिळाला; पोलिसांचे कौतुक**

आम्ही या प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची मागणी केली होती, त्यामुळेच हा निर्णय इतक्या लवकर येऊ शकला. महाराष्ट्र पोलीस आणि पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणात जे कौतुकास्पद काम केले आहे, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे आहेत. अशा नराधमांना थेट फाशीची शिक्षा झाली, तरच गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती निर्माण होईल आणि भविष्यात अशा भयानक घटना थांबतील, असा विश्वासही सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला.

## समृध्दी महामार्गावर काळाचा घाला चंद्रपूरच्या एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** समृद्धी महामार्ग पुन्हा एकदा रक्ताने माखला असून एक अत्यंत काळजाचा थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. समृद्धी महामार्गावर झालेल्या एका भीषण अपघातात चंद्रपूरमधील एकाच कुटुंबातील तब्बल ५ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. एका बाजूला घरात शासकीय नोकरी लागल्याचा प्रचंड आनंद होता, पत्नीच्या नोकरीच्या पहिल्याच दिवशी जॉइनिंगसाठी हे कुटुंब चंद्रपूरवरून अकोल्याकडे जात होते, मात्र समृद्धी महामार्गावर या हसत्याखेळत्या कुटुंबाचा काळ वाट पाहत होता. एका क्षणात या कुटुंबातील तीन पिढ्या संपल्या आहेत.

हा भीषण अपघात अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यात समृद्धी महामार्गाच्या चॅनल क्रमांक १०६ जवळ घडला. चंद्रपूर शहरातील बाबुपेठ परिसरातील रहिवासी असलेले जीवने कुटुंब कारने अकोल्याच्या दिशेने जात होते. आरती जीवने यांना नवीन शासकीय नोकरी मिळाली होती आणि त्याच नोकरीवर रुजू होण्यासाठी पती भास्कर जीवने आपल्या संपूर्ण कुटुंबासह गाडी चालवत होते. मात्र, धामणगावनजीक रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका मोठ्या कंटेनरला या भरधाव वॅगनार कारने पाठीमागून अत्यंत जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भयानक होती की कारचा पुढचा भाग थेट कंटेनरच्या खाली घुसला आणि गाडीचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या अपघातात कारमधील पाचही जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघात महादेव जिवाजी जीवने (६५), लताबाई महादेव जीवने(५८), भास्कर महादेव जीवने(४५), आरती भास्कर जीवने(४०), त्रिशा भास्कर जीवने(१२) यांचा मृत्यू झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि स्थानिक रेस्क्यू टीमने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कारचा चक्काचूर झाल्यामुळे मृतदेह बाहेर काढण्यासाठी प्रशासनाला मोठी कसरत करावी लागली. सर्व मृतदेह धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

ज्या घरातून काही तासांपूर्वी आनंदाने हे कुटुंब निघालं होतं, तिथे आता फक्त आणि फक्त आक्रोश शिल्लक राहिला आहे. एकाच कुटुंबातील ३ पिढ्या एका फटक्यात नष्ट झाल्याने संपूर्ण चंद्रपूर शहरावर शोककळा पसरली आहे.

## खापरखेडा औष्णिक वीज केंद्राची सुरक्षा म्हणजे 'उपरसे टापटीप, अंदरसे रामजाने'

- सुरक्षा यंत्रणेला भेदून ६० किलो कॉपर केबलची चोरी
- क्यूआरटी पथकाने आरोपीला रंगेहात पकडले
- मात्र पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल
- श्रेय लाटण्यासाठी खापरखेडा पोलिसांचा गेम?
- सुरक्षा यंत्रणेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** मोठ्या प्रमाणात मथाडी व खाजगी सुरक्षा रक्षकांचा फौजफाटा, शिवाय सोबतीला महानिर्मितीची स्वतःची सुरक्षा यंत्रणा व्यवस्था असलेल्या खापरखेडा औष्णिक वीज केंद्राची सुरक्षा म्हणजे 'उपरसे टापटीप, अंदरसे रामजाने' अशी झाली आहे .

२८ जूनच्या मध्यरात्री सुरक्षा व्यवस्थेला भेदून अज्ञात चोरट्यांनी ५०० मेगावॅट वीज केंद्राच्या इलेक्ट्रिक मेन्टेनन्स स्टोअरच्या बाजूला ठेवलेला ६० किलो वजनाचा कॉपर केबल लंपास केला. वीज केंद्राच्या क्यूआरटी पथकाने एका आरोपीला ६० हजार रुपयांच्या मुद्देमालासह रंगेहात पकडून खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन केले, शिवाय पसार झालेल्या आरोपींची नावे दिली असे असतांना खापरखेडा पोलिसांनी चक्क 'अज्ञात चोरट्यांविरुद्ध' गुन्हा दाखल केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे खापरखेडा पोलिसांच्या व क्यूआरटी पथकाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सुशील दिगांबर वाहने (जयभोले नगर, चनकापूर असे असून राहुल तीलकचंद गुप्ता, पुनीत भगत, सुरज उर्फ मुसा वरणकर असे पसार झालेल्या आरोपीची नावे आहेत. २८ जूनच्या मध्यरात्री ५०० मेगावॅट इलेक्ट्रिक मेन्टेनन्स स्टोअर्स रूमच्या बाजूला ठेवलेला अंदाजे ६० किलो वजनाचा कॉपर केबल गायब असल्याचे पेट्रोलींगवर असलेल्या क्यूआरटी पथकाला दिसून आले. कनिष्ठ सुरक्षा अधिकारी राजेश तळेले, मुख्य सुरक्षा रक्षक सुभाष गुरारीकर, सुरक्षा रक्षक रवींद्र तांडेकर व आकाश विश्वकर्मा यांच्या पथकाने तात्काळ परिसरात शोधमोहीम सुरू केली. शोध सुरू असतानाच खापरखेडा पोस्ट ऑफिस जवळील वीज केंद्राच्या सुरक्षा भिंतीवरून काही चोरटे उड्या मारून पळून जाण्याच्या प्रयत्नात असल्याचे पथकाला दिसले. क्यूआरटी पथकाने अज्ञात चोरट्यांचा पाठलाग केला असता चोरटे मुद्देमाल सोडून पळू लागले त्यातील सुशील वाहने या आरोपीला मुद्देमालासह रंगेहात पकडले. यावेळी साथीदार तीन आरोपी पसार झाले. क्यूआरटी पथकाने जप्त केलेला मुद्देमाल व पकडलेल्या आरोपीला खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन केले. क्यूआरटी पथकाने आरोपीला रंगेहात पकडले, मुद्देमाल जप्त केला व पळून गेलेल्या आरोपींची नावेही पोलिसांना दिली. असे असताना तक्रारकर्ते व कनिष्ठ सुरक्षा अधिकारी राजेश तळेले यांनी खापरखेडा पोलिसात अज्ञात चोरट्यांविरुद्ध तक्रार का दाखल केली? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. चोरीचा छडा लावण्यासाठी आरोपीला पकडण्याचे श्रेय खापरखेडा पोलिसांनी स्वतः कडे घेण्यासाठी हा गेम खेळला असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे. मुळात क्यूआरटी पथकातील कर्मचारी खापरखेडा औष्णिक वीज केंद्र प्रशासनाला जबाबदार आहेत. मात्र, पोलिसांना श्रेय देण्यासाठी वीज केंद्राच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दबावापोटी कनिष्ठ सुरक्षा अधिकारी राजेश तळेले यांनी अज्ञात आरोपी विरुद्ध तक्रार दिल्याचा आरोप केला जात आहे.

**क्यूआरटी पथक वादाच्या भोवऱ्यात, चौकशीची मागणी!**

रंगेहात पकडलेल्या गुन्हेगाराला कागदोपत्री अज्ञात आरोपी ठरवण्याच्या प्रयत्नामूळे खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे क्यूआरटी पथक व सुरक्षा प्रशासन वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. पोलिसांशी लागेबांधे पाळण्यासाठी हा प्रकार घडला का अशी शंका उपस्थित केली जात आहे. कोट्यवधी रुपयांची यंत्रसामग्री असलेल्या या संवेदनशील वीज केंद्राच्या सुरक्षेशी असा खेळ खेळणाऱ्या क्यूआरटी पथकाची व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## शिवडे येथे मध्यरात्री घरफोडी ; साडेपाच लाखांचा ऐवज लंपास




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि२९ उंब्रज :** कराड तालुक्यातील शिवडे येथील बालाजीनगर परिसरात रविवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून रोख रक्कम व सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह ५ लाख ६ हजार ८०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी उंब्रज पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संजय गुलाबराव भोसले (वय ५३, रा. बालाजीनगर, शिवडे, ता. कराड) यांच्या राहत्या घरात २८ जूनच्या मध्यरात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी टेरेसवरील सिमेंटच्या दरवाजाची कडी तोडून प्रवेश केला. त्यानंतर घरातील आई शांताबाई यांच्या बेडरूममध्ये जाऊन टेबलच्या ड्रॉवरचे लॉक उघडून त्यामध्ये ठेवलेली २ लाख ७० हजार रुपयांची रोख रक्कम तसेच सोन्याच्या चेन, सोन्याच्या रिंगा, चांदीचे वाळे, अन्नपूर्णा मूर्ती, निरंजन व इतर चांदीच्या वस्तू असा एकूण ५,०६,८०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

घटनेची माहिती मिळताच उंब्रज पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५ व ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भोसले करीत आहेत.

## नसरापूर घटना प्रकरणी आरोपीला तिहेरी फाशी; वेगवान न्यायदानाचा नवा बेंचमार्क - मुख्यमंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, मुंबई :** पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अल्पवयीन मुलीवरील अत्याचार आणि हत्येच्या प्रकरणात ५९ दिवसांत न्यायप्रक्रिया पूर्ण करत न्यायालयाने आरोपीला तिहेरी फाशीची शिक्षा सुनावून वेगवान न्यायदान देऊन नवीन बेंचमार्क तयार केला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्यायप्रक्रियेतील संपूर्ण घटनाक्रमाची माहिती देऊन या प्रकरणात १६ दिवसांत ५५ साक्षीदारांच्या साक्षी, तपासणी आणि उलटतपासणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याचे सांगितले. २५ जून २०२६ रोजी न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले आणि २९ जून २०२६ रोजी तिहेरी फाशीची शिक्षा सुनावली. घटना घडल्यानंतर अवघ्या ५९ दिवसांत संपूर्ण न्यायप्रक्रिया पूर्ण होऊन शिक्षा झाल्याने हा न्यायव्यवस्थेतील महत्त्वाचा टप्पा ठरला असल्याचे ते म्हणाले.

या प्रकरणात न्यायमूर्ती एसआर साळुंखे यांनी सातत्यपूर्ण सुनावणी घेत वेगवान न्यायदानासाठी पुढाकार घेतला. अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये वेळेत न्याय मिळणे अत्यंत आवश्यक असून न्यायालयाने या प्रकरणातून नवा बेंचमार्क निर्माण केला आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी या घटनेच्या न्यायदानाबाबत माहिती देताना सांगितले.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत सक्षमपणे पुरावे गोळा करून न्यायालयासमोर मांडले. पोलिसांनी गोळा केलेल्या ठोस पुराव्यांमुळे फाशी शिक्षा देणे शक्य झाले. विशेष सरकारी वकील यांनीही प्रभावीपणे बाजू मांडून खटल्याची यशस्वी हाताळणी केली असे सांगत त्यांनी पोलीस दलासह सर्वांचे अभिनंदन केले.

समाजात अशा घटना घडू नयेत, ही सर्वांचीच अपेक्षा आहे. मात्र, अशा अमानुष गुन्ह्यांमध्ये पोलीस, सरकारी पक्ष आणि न्यायालय यांनी समन्वयाने काम केल्यास अत्यल्प कालावधीत कठोर शिक्षा मिळू शकते, हे या प्रकरणातून सिद्ध झाले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

पीडित मुलीच्या पालकांचे दुःख कोणत्याही शिक्षेने भरून निघणार नसले, तरी न्यायालयाने आरोपीला सुनावलेली तिहेरी फाशीची शिक्षा त्यांना न्याय मिळाल्याची भावना देणारी ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




## दिवस पेरणीचे, माणुसकी जपणारे

आमच्या लहानपणी पाऊस अगदी वेळेवर येत असे.मे महिन्याच्या अंतिम आठवड्यात मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटात अवकाळी पाऊस पडायचा.सगळी धरणी ओलिचिंब होऊन जात असे.अवकाळी पावसाच्या पाण्याने रान शिवारात रानभाज्या उगवायच्या,इवले इवले गवत जमिनीतून डोके वर काढायचे.काही झाडांना नवीन पालवी फुटायची.धरतीचे रूप मनमोहक व्हायचे.जून महिन्यात मृग नक्षत्राला प्रारंभ झाला की पावसाळा ऋतूचे थाटात आगमन व्हायचे.सगळे आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरून यायचे.थंड वाऱ्याची झुळूक यायची आणि ढगांचे सांद्रीभवन होऊन शांत व निश्चल

पाऊसधारा जमिनीवर बरसायच्या.कधी कधी रात्रभर एकसमान वेगाने पाऊस पडायचा.पहाटे पहाटे पाऊस विश्रांती घ्यायचा.दिवस उजाडला की सकाळ कशी स्वच्छ व चकचकीत दिसायची. सूर्य उगवायचा आणि जिकडे तिकडे लख्ख प्रकाश पसरायचा.पावसाने ओलिचिंब झालेलं धरणी सूर्यप्रकाशात अतिशय सुंदर दिसायची.हे चित्र पाहून लहानथोर मंडळी हुरळून जायची.तिकडे शेतकरी बांधवांची मात्र सकाळपासून धावपळ सुरू व्हायची.शेतात पेरणी करण्यासाठी बियाने,खत,तिफण,सरते, बैल आणि मजूर यांची जुळवाजुळव सुरू होत असे.

पावसाचे पाणी पिऊन तृप्त झालेल्या वावरात मिरगाचे लाल किडे हळुवार हालचाल करताना दिसायचे. पावशा पक्षी जीव तोडून 'पेरते व्हा,पेरते व्हा' ची रट लावायचा.वारा वाहणे बंद असल्याने झाडे स्थिर स्थितीत थांबायची,वारा वाहू लागला की झाडे डोलायची.मन प्रसन्न करून टाकणाऱ्या वातावरणात पेरणी सुरू होत असे.तिफण,बियाणे,खत,सरते यांची पुजा केली जायची.बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घातला जायचा. धरणीमातेला मनोभावे वंदन करून पेरणीला आरंभ व्हायचा.जिकडे बघितले तिकडे शिवारातील प्रत्येक शेतात शेतकरी व शेतमजूर पेरणी करताना दिसायचे.पेरणी करण्यासाठी झाडून सगळा गाव शेतामध्ये दाखल होत असे.पेरणीच्या दिवसांत तिकडे गावात सहसा कोणी राहत नसे.त्यामुळे गावभर शांतता पसरलेली असायची. इकडे शेतात मात्र लोकांची वर्दळ सुरू झालेली असायची. धरणी मातेच्या उदरात,शेतातील ओल्या मातीत बियाणे पेरण्याची घाई शेतकऱ्यांना झालेली असायची.कारण अखंडपणे पावसाला सुरुवात झाल्यावर पेरणी लांबायची. जर पेरणीला उशीर झाला तर उत्पन्न घटते याची जाणीव ठेवून व इतर कामांना बगल देऊन शेतकरी पेरणीला प्राधान्य द्यायचे.


दुपारच्या वेळी भूक लागल्यानंतर पेरणीचे काम थांबवले जायचे.सरत्याने खत किंवा बियाणे पेरणारे मजूर घागरीत आणलेल्या पाण्याने हात धुवायचे आणि बांधून आणलेली भाकर भाजी खायचे.शेतकरी राजा मात्र बैलांना मोकळे सोडून त्यांना पाणी पाजवायचा,त्यांच्या पुढे कडबा व वाळलेले गवत खाण्यासाठी टाकायचा. बैलांच्या पाठीवरून मायेचा हात फिरवायचा.मग पत्नीने दिलेली भाकरी भाजी हातावर घेऊन उभ्या उभ्या खायचा. तांब्याभर पाणी पिऊन पुन्हा पेरणीला सज्ज व्हायचा. दिवस मावळे पर्यंत पेरणीचे काम चालायचे.मजूर लोक शेतकऱ्यांना मनोमन साथ द्यायचे. अशाप्रकारे पेरणीचे काम पंधरा वीस दिवस चालायचे.पेरणी उरकल्यानंतर सगळे सुटकेचा निःश्वास टाकायचे. पेरणीच्या दिवसांत गावात कोठे भांडण तंटा वा वादविवाद होत नसे. सगळेजण माणुसकीने वागायचे.एकमेकांच्या मदतीला धावून जायचे.ज्या ज्या शेतकऱ्यांची पेरणी अगोदर संपायची ते शेतकरी इतर शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जायचे व पेरणी करायचे.मजूर लोक सुद्धा आळस व कंटाळा न करता ठरलेल्या मजुरीत पूर्णवेळ पेरणीचे काम करायचे.जात,धर्म,वंश विसरून आणि एकमेकांत मिसळून दुपारचे जेवण एकत्र करायचे,शेतात बियाणे पेरायचे आणि एकमेकांच्या मनात माणुसकी पेरण्याचे काम करायचे.माणुसकीला जपायचे.पेरणी संपल्यानंतर इतर कामांना हात लावला जायचा.शाळेची घंटा वाजली की आम्ही शाळेत जायचो.

आजकाल माणुसकीला जपणारी तशी पेरणी सहसा कुठे दिसत नाही. शेतीची सगळी कामे यंत्राद्वारे केली जात आहेत.पेरणी सुध्दा ट्रॅक्टरच्या साहाय्याने केली जात आहे.त्यामुळे पेरणीचे काम आता झटपट होत आहे. त्यामुळे शेतातील पेरणीच्या कामाबरोबरच माणुसकी पेरण्याचे कार्य आता बंद झाले आहे.शेतात बैलांची जागा यंत्राने घेतली आणि माणूस निर्जीव झाला.माणुसकी पेरणेही बंद झाले आहे.पेरणीचे ते अविस्मरणीय दिवस आता भूतकाळात जमा झाले आहेत!

**– बबन दामोदर गुळवे**

# मानव कल्याणार्थ खेळला जाणारा नैतिक जुगार–पेरणी

आपल्या कानाला ऐकायला थोडंसं विचित्र वाटेल की हा नैतिक जुगार आहे तरी काय?आणि हो ! हे तेवढंच सूर्यप्रकाशाइतकं सत्य आहे कारण माझा शेतकरी राजा आपल्या वैयक्तिक तथा कुटुंबाच्या गरजा बाजूला ठेवून पोटाला चिमटा देऊन गावठी सावकार, सोसायट्या तथा बँकाकडून हजारो रुपयाचं पेरणीसाठी कर्ज घेतो.बी–बियाणे शेतीत ओततो व त्याचं पुढे काय होईल हे माहित नाहीतरी पेरणी करतो. म्हणूनचपेरणी हा मानव कल्याणार्थ खेळला जाणारा नैतिक जुगार आहे,असे म्हणणे अतिशयोक्ती वाटले तरी त्यामागे मोठे वास्तव दडलेले आहे. शेतकरी बी जमिनीत टाकताना त्याला खात्री नसते की पाऊस वेळेवर पडेल,पीक रोगराईपासून वाचेल किंवा बाजारात योग्य भाव मिळेल.तरीही तो आशा,धैर्य आणि परिश्रम यांच्या बळावर पेरणी करतो.




ढग दाटून आल्यावर शेतकरी राजा पहिल्या पावसाच्या आगमनप्रसंगी आनंदोस्तव साजरा करतात.काही शेतकरी वेड्या आशेपायी धूळपेरणीसुद्धा करतो.पेरणी करुन पावसाच्या आशेने आभाळकडे बघतो.यदा कदाचित पावसाने दांडी मारली तर,दुबार पेरणी करावी लागते.त्यात हजारो रुपयांचा चुराडा होतो. कारण त्याला हवामानाचा अंदाज येत नाही.हल्ली पावसाचे प्रमाणही काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी ढगफुटीसदृश्य परिस्थिती घडतांना दिसून येते.अश्या या वातावरणातील असमतोलाचा फटका मात्र शेतकऱ्यांनाच सहन करावा लागतो. कारण दुष्काळजन्य परिस्थितीत पिके सुकून जातात.पाण्याअभावी अक्षरश: जळून जातात तर ढगफूटी सारख्या अतिपावसामूळे नदी नाले तुडुंब भरून वाहतात व त्याचबरोबर शेतीतील काळी माती व पिकेही वाहून जातात. बघा ना ! अजून पिक हातात आलेले नसते तरी या संकटाचा सामना माझा शेतकरी राजा करतो. कष्टाचे,मेहनतीचे पैसे खर्च करुन नैतिककार्याच्या माध्यमातून हे उद्याच्या भविष्यासाठी पेरणी करतो.सांगा ! आहे की नाही? हा मानवकल्याणार्थ जगाच्या पोशिंद्याकडून खेळला जाणारा नैतिक जुगार..!

भविष्यातील स्वप्न उराशी बाळगून पेरणी नावाचा हा जुगारतो शेतकरी दादा स्वतःच्या स्वार्थासाठी खेळत नसतो.स्वतःच्या कुटुंबाच्या गरजांबरोबरच संपूर्ण समाजाच्या अन्नसुरक्षेसाठी हा तो धोका स्वीकारतो.त्याच्या पेरलेल्या प्रत्येक दाण्यात लाखो लोकांच्या उदरनिर्वाहाची आशा दडलेली असते.म्हणूनच हा जुगार मानवाच्या कल्याणासाठी खेळला जातो.एवढं वाघाचं काळीज फक्त त्या जगाच्या पोशिंद्याचच असतं.मित्रांनो !खिशातून चुकून पाच किंवा दहाचा शिक्का सार्वजनिक ठिकाणी पडला तर, व्यक्ती इकडे–तिकडे खाली–वर आजूबाजूला शोधतो आणि कितीतरी वेळ शोधूनही सापडला नाहीतर,मन अस्वस्थ करुन मनाला हूरहूर लावून बसतो.मात्र माझा हा शेतकरी राजा केवळ भल्या मोठ्या आभाळाच्या छताखाली उघड्या जमिनीवर लाखो रुपयांचं बी–बियाणं ओतून मोकळा होतो. कुठल्याही संरक्षणाविना...! उद्या त्याचं काय होइल हे निश्चित माहित नसतांही..!

निसर्गाने साथ दिली तर शेत सोन्यासारखे बहरते.साथ सोडली तर कष्ट,वेळ आणि पैसा वाया जाण्याची भीती असते. आज हवामानाच्या असमतोलामूळे ही अनिश्चितता अधिक वाढली आहे.कधी अतिवृष्टी,कधी दुष्काळ,कधी अवकाळी पाऊस, तर कधी गारपीट यामुळे शेतकऱ्याचे नियोजन विस्कळीत होते.म्हणून माझ्या शेतकरी बांधवांनो,काळ बदलत चालला आहे.आधुनिक शेतीचा अवलंब करा.हवामानाचा अंदाज,माती परीक्षण,सुधारित बियाणे,ठिबक सिंचन,पीकविमा आणि तंत्रज्ञानाचा वापर करा.शेतीविषयक ज्ञान देणारी पुस्तके, साप्ताहिक, मासिकांचे वाचन करा.कृषि प्रदर्शने, सेमिनार,चर्चासत्र यांना भेटी द्या.त्यामुळे शेतीविषयक ज्ञानप्राप्ती होऊन आधुनिक शेती केल्यास संभाव्य संकटे टळतील व संरक्षण मिळेल.असे हे उपाय या पेरणीच्या जुगारातील धोका कमी करतील.

अश्याप्रकारे माझा शेतकरी राजा पावसाळ्यात नव्या आशेने पेरणी करतो.शेतकरी जुगार नशिबाशी खेळत नाही,तो भविष्याशी करार करतो.त्याच्या हातातील बीज हे फक्त धान्याचे नसते,तर संपूर्ण मानवजातीच्या उद्याच्या जीवनाचे बीज असते. म्हणूनच पेरणी ही नुसती शेतीची सुरुवात नसून,ते मानवकल्याणासाठी केलेले आशेचे ,विश्वासाचे आणि त्यागाचे पवित्र कार्य आहे.जय किसान...!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

# परीक्षा पद्धत बदल,अन्यथा, ही पेपरफुटी अटळ...?




आजवर विद्यार्थ्यांचा पेपर फुटत होता, पण आता जे विद्यार्थी घडवतात, त्या मास्तरांची पात्रता सिद्ध करणाऱ्या परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे मोठा गहजब उडाला आहे. म्हणजे जे मास्तर विद्यार्थी घडवतात, त्यांना शिक्षणाचे आणि नैतिकतेचे धडे देतात. देशाचे नागरिक घडवतात, त्या मास्तरांचा पेपर फुटला आहे. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) पेपर आदल्याच दिवशी म्हणजे २७ जून रोजी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे फुटल्याचे उघडकीस आले. या पेपरफुटीमुळे ६ लाखांपेक्षा जास्त परीक्षार्थींचे नुकसान झाले असून परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षे (नीट) नंतर टीईटी पेपरफुटी झाली. त्यामुळे याला चाप लावण्यासाठी अत्याधुनिक विज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञानाच्या काळात परीक्षापद्धतीत बदल होण्याची गरज निर्माण झाली आहे. दहावी, बारावी किंवा इतर महत्वाच्या परीक्षांचे पेपर याआधीही फुटत होते.

परंतु व्हॉट्सअ‍ॅप किंवा प्रसार समाज माध्यमे त्याकाळी एवढी सक्षम नव्हती. आज फुटलेला पेपर काही सेकंदात हजारो उमेदवारांपर्यंत पोहचवला जातो. त्यामुळे परीक्षार्थींचे होणारे नुकसानही त्याच वेगाने वाढते. टीईटी आणि नीटसारख्या मोठ्या परीक्षांचे पेपर फुटतात, तेव्हा त्याचे परिणाम फक्त एका दिवसापुरते मर्यादित नसतात. ही दुर्घटना एका बाजूला पात्र उमेदवारांचे भवितव्य अंधारात ढकलते, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या कुटुंबाला मानसिक आणि आर्थिक गर्तेत लोटले जाते. यातून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांनी हा विषय कमालीचा गंभीर होतो, यातून विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावाचा अंदाज येऊ शकतो.

स्पर्धा परीक्षांची तयारी हा आता एक मोठा आर्थिक व्यवहार झाला आहे. उमेदवारांची वाढती संख्या आणि नियुक्ती तसेच शिक्षण संधीच्या घटणाऱ्या जागा असे हे व्यस्त प्रमाण आहे. पेपरफुटीतून आर्थिक नुकसान होतेच, मात्र विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला तडा जातो. व्यवस्थेवरील विश्वास उडाल्याने प्रामाणिकपणा, मेहनत आणि अभ्यास करूनही यशाची खात्री नसल्याने विद्यार्थी हताश होतात. सरकारी, खासगी शिक्षणसंस्थापेक्षा खासगी क्लासेसकडून होणाऱ्या शिक्षणाच्या व्यावसायिकरणाला पाठबळ मिळते. राज्यातील शिक्षण संस्थांची स्थिती पाहता बेकायदा 'इंटीग्रेशन'ची वाढती व्यवस्था पेपरफुटी आणि शिक्षणाच्या बाजारीकरणाला खतपाणी घालणारी असल्याचे आजपर्यंतच्या अनुभवातून स्पष्ट होते. यातून पालकांची क्षमता नसताना प्रसंगी कर्ज काढून लाखो रुपयांचे कोचिंग क्लासेस पाल्यांसाठी लावले जातात. त्यासाठी शेती, मालमत्ता, दागिनेही गहाण ठेवणे, विकून टाकण्याचे प्रकार होतात. शिक्षण व्यवस्थेच्या बाजारीकरणातून गरीब विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे अतोनात शोषण होत असते.

पेपरफुटीनंतर वर्षभराची मेहनत आणि भविष्यातील स्वप्नांना एकत्रच सुरूंग लागतो. परीक्षा, प्रवास, पाठ्यपुस्तकांचा खर्च वाया जातो, परीक्षा रद्द झाल्याने पुन्हा तसाच खर्च नव्याने परीक्षेसाठी करावा लागणार असल्याने खर्चाचा बोजा दुपटीने वाढतो. जे विद्यार्थी दोन–दोन वर्षे प्रामाणिकपणे दहा, चौदा तास अभ्यास करतात, त्यांना बसलेल्या मानसिक धक्क्याचा अंदाज लावता येत नाही. विद्यार्थ्यांचे मनोधैर्य खचून गेल्याने त्यातून होणारे नुकसान त्यांच्या संपूर्ण भविष्यावर परिणाम करते. पुढील परीक्षा तरी पारदर्शकपणे होईल का? त्यात गैरप्रकार झाले तरी ते लपवले जातील का, या विचारांमुळे विद्यार्थ्यांचे नैराश्य कमालीचे वाढते. पेपर फुटल्यानंतर त्या वर्षाची परीक्षा रद्द झाल्यावर गेलेल्या वेळेचे आणि वाढलेल्या वयाचे नुकसान भरून निघणारे नसते. वय निघून गेल्याने अपात्रतेमुळे शैक्षणिक आणि नोकरीच्या संधींना मुकावे लागते.

प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेपेक्षा लबाडीला संधी मिळत असल्याचे समोर आल्यानंतर मूल्यांवरील उडालेला विश्वास जास्त हानीकारक असतो. फुटलेल्या पेपरची खरेदी, विक्रीतून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासापेक्षा गुन्हेगारी मानसिकता वाढीस लागते. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचा देशाच्या, राज्याच्या शिक्षण आणि परीक्षा पद्धतीवरील विश्वास पूर्णपणे उडून जात आहे. अभ्यास करून काही फायदा नाही, शेवटी वशीला आणि पैसाच चालतो, अशी नकारात्मक भावना तरुणांमध्ये निर्माण होते, जी समाजासाठी अत्यंत घातक आहे. भिवंडीतील टीईटी पेपरफुटी प्रकरण हा नियोजनबद्ध आंतरराज्य संघटित गुन्हेगारीचा प्रकार असल्याचे समोर आले आहे. या कारस्थानाच्या पुढील तपासात आणखी गोष्टी उघड होतीलच. मात्र आपल्याकडील पारंपरिक परीक्षा पद्धत ही आधुनिक तंत्रसाधनांच्या आव्हानापुढे कमालीची कमकुवत असल्याचे अशा घटनांतून वारंवार स्पष्ट होत आहे. 'नीट' परीक्षेच्या गोंधळानंतर आलेल्या अनुभवातून 'टीईटी' साठी उपाययोजना केली गेली असतानाही पेपर फुटला. प्रश्नपत्रिकेची वाहतूक, साठवणूक आणि वितरण पद्धतीमधील तांत्रिक कमकुवतपणामुळे आरोपींना पेपर आधीच मिळवण्यात यश आल्याचे समोर आले आहे.

आजच्या डिजिटल युगात जुन्या पद्धती वापरून पेपर सुरक्षित ठेवणे अशक्य झाले आहे. याच डिजिटल माध्यमांचा वापर करून पेपरफुटीतील त्रुटी कमी करता येतील. त्यासाठी तंत्रज्ञ आणि शिक्षण विभागांनी एकत्रीत उपाययोजना करण्याची गरज आहे. प्रश्नपत्रिकेच्या साठवणुकीचा वेळ अत्यंत कमी करणे गरजेचे आहे, शिवाय वॉटरमार्क, युनिक कोडींग यंत्रणेतील दोष दूर करता येतील. गोपनियतेसाठी परीक्षा यंत्रणेत दोन किंवा तीन व्यक्तींवरच जबाबदारी असायला हवी. अत्याधुनिक तंत्राचा वापर करून होणारा गैरवापर कसा रोखता येईल, यावर अभ्यास व्हायला हवा. पेपर प्रश्नांच्या निवडीपासून ते परीक्षा पद्धतीपर्यंत सर्वच घटकांमधील दोषांचे निराकरण करण्याची गरज आहे. पेपरफुटी रोखण्यासाठी पेपर फुटून लीक झाल्याचा परिणाम नियंत्रित ठेवण्यासाठी प्रश्न निवडीपासून ते परीक्षेपर्यंतचे सर्वच घटक दोषरहित करायला हवे. त्यातील त्रुटी कमी करणे शक्य आहे, गरज आहे ती इच्छाशक्तीची. कारण काळ बदलत आहे, त्यानुसार परीक्षा पद्धतीतही बदल करावे लागतील. अन्यथा, ही पेपरफुटी अटळ आहे, असे वाटते.

## फाशी हवी

वासनांध गुन्हे करी
खेळ करे कायद्याशी
वेळ लागे खटल्याले
जोडजुडे फायद्याशी

मुश्किले न्याय लाभे
झुंज देताना विषाशी
निवाड्याशिक्षाफाशी
वाटे मिळे सुवर्णराशी

लांबेअंमलबजावणी
का देतनाही रे फाशी
ऐनवेळी कुठलीतरी
नेमकी शिंकते माशी

पुन्हापुन्हा होई अशी
नराधम्यांची रे सरशी
निगरगट्ट महा राक्षस
भिती वाटेना फारशी

एन्काऊंटर बरे होते
कुणी बोले कानाशी
जंगलराजाचाकायदा
विचार रूंजतोमनाशी

लचके तोडत शरीराचे
गिधाडे हिंडे आकाशी
खेळरंगला लाडग्यांचा
शेळी जाई जीवानिशी

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# सणांवर विनोद करू नका !

नुकताच वटपौर्णिमा सर पार पडला. पती–पत्नीमधील पवित्र नात्याची आणि पातिव्रत्याची महिती सांगणारा हा सण समस्त महिला उत्साहाने साजरा करतात. वटपौर्णिमा झाली की एकेक हिंदू सणाला सुरुवात होते.

या सणांच्या निमित्ताने जसे शुभेच्छा आणि सणांची माहिती देणारे संदेश सामाजिक माध्यमांतून फिरू लागतात तसे या सणांचे विडंबन करणारे आणि त्यांवर विनोद करणारे संदेशही फिरू लागतात. हिंदू धर्मातील प्रत्येक सणामागे धर्मशास्त्र असून तो सण कशाप्रकारे साजरा करावा याविषयीचे सविस्तर ज्ञान आपल्या ऋषीमुनींनी हजारो वर्षांपूर्वी मांडून ठेवले आहे. कालानुरूप सृष्टीत होत जाणारे बदल तसेच धर्मग्रंथातील सत्यकथा यांचा आधार या सण आणि उत्सवांमागे दडलेला असतो. प्रत्येक गोष्ट ही ईश्वराचेच रूप असून जीवसृष्टीसह निर्जीव वस्तूतही त्याचे अस्तित्व असते त्यामुळे या सर्वांचा सन्मान करण्याची शिकवण या सणांच्या माध्यमांतून आपल्याला मिळत असते. वटपौर्णिमेला वडाला म्हणजेच वृक्षाला पुजले जाते.

नागपंचमीला नागाला, तर पोळ्याच्या दिवशी बैलाला पुजले जाते. दसऱ्याच्या दिवशी वापरातील उपयुक्त शस्त्रांचे आणि वस्तूंचे पूजन केले जाते. पितृपक्षाच्या निमित्ताने कावळ्याच्या रूपाने पूर्वजांना घास भरवला जातो. अशाप्रकारे चराचरावर निरपेक्ष प्रेम करायला शिकवणारे हिंदू धर्मातील सण हिंदू धर्माचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे.

आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि घरातून सणांविषयी न मिळणारे ज्ञान यांमुळे हिंदूंच्या सण–उत्सवांवर विनोद करताना आणि ते फॉरवर्ड करताना यांना फारसे वावगे वाटत नाही; मात्र ज्यांना आपले सण आणि उत्सव याविषयीचा सार्थ अभिमान आहे त्यांनी असे संदेश पुढे न पाठवता अशा विनोदवीरांना सणांमागील शास्त्र सांगावे,

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पेण तालुक्याच्या ग्रामीण भागात वटपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२९, पेण :** तालुक्यासह ग्रामीण भागात वटपौर्णिमेचा सण सोमवारी मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच विवाहित महिलांनी पारंपरिक नऊवारी व आकर्षक साड्यांमध्ये सजून गावातील वडाच्या झाडाजवळ एकत्र येत विधिवत पूजा केली.

महिलांनी वडाच्या झाडाला पवित्र दोरे गुंडाळून प्रदक्षिणा घालत आपल्या पतीच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि सुखी संसारासाठी प्रार्थना केली. पूजा, आरती, फळे, फुले आणि नैवेद्य अर्पण करून धार्मिक परंपरा जपण्यात आली. अनेक ठिकाणी महिलांनी एकत्र येऊन पारंपरिक गीते म्हणत सणाचा आनंद द्विगुणित केला.

ग्रामीण भागातील या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेमुळे गावांमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग आणि पारंपरिक वेशभूषेमुळे वटपौर्णिमेचा उत्सव अधिकच आकर्षक ठरला.

## पोलीस अधिकारी म्हणून बनाव करत असलेल्या तोतया अधिकाऱ्यास गुन्हे शाखेकडून अटक



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२९, मुंबई :** कक्ष -१, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई येथे प्राप्त तक्रारीवरून 'एक संशयित इसम वय अंदाजे ५४ वर्ष, वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करून बनावट शासकीय ओळखपत्रे व पोलीस लिहिलेली पाटी असलेल्या मोटार कारचा वापर करून त्याच्या इतर साथीदारांसह बँकेतून कर्ज मंजूर करून देण्याच्या बहाण्याने नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणूक करीत असल्याची तक्रार प्राप्त होती.

सदर प्राप्त माहितीच्या अनुषंगाने मानवी व तांत्रिक तपास कौशल्याचा वापर करून सदर संशयित इसम हे हॉटेल 'द लीला, अंधेरी, मुंबई येथे येणार असल्याची माहिती प्राप्त होताच, कक्ष -१ चे पोलीस पथकासह सदर ठिकाणी सापळा रचून दि.२६/६/२०२६ रोजी एकूण तीन संशयित इसमांना पोलीस पाटी असलेल्या राखाडी रंगाच्या MH12XH9447, TATA PUNCH मोटार कारसह ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर संशयित इसमांकडे वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याची बनावट शासकीय ओळखपत्रे, इतर बनावट कागदपत्रे मिळून आली आहेत.

सदर संशयित इसमांच्या विरोधात गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई येथील गु.र.क्र. ७२/२०२६ कलम २०४, २०५, ३१८(४), ३१९, ३३६(३), ३३७, ३४०, ३(५) भारतीय न्याय संहिता (सहार पोलीस ठाणे ०५७८/२०२६) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्हातील आरोपी खालीलप्रमाणे १)माशाब खतीब, २) मोहम्मदगौस इब्राहिम खतीब, व ३) डॉ राज खतीब हे आहेत

यातील आरोपी क्र. ३ याचा गुन्हे अभिलेख पुढीलप्रमाणे -

१) कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे.
गु.र.क्र. ३६४/२०२५
कलम:- ३१८, १३६(२), ३(५)
भारतीय न्याय संहिता

२) साकीनाका पोलीस ठाणे.
गु.र.क्र. ४५९/२०१८
कलम :- १४९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब)भा.दं.वि..

३)खेरवाडी पोलीस ठाणे.
गु.र.क्र. १८२/२०१८
कलम :- ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ भा.दं.वि.

अन्वये गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) राज तिलक रौशन व सहाय्यक पोलीस आयुक्त (डी/दक्षिण) दिनकर शिलवटे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष -१, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबईचे प्रभारी पोलीस निरीक्षक गणेश पिसाळ, स.पो.नि.देविदास लाब्धे, स.पो.नि. सांगळे, पो.ह. ९८०२८९/शिंदे, ९६०८७६/सानप, ९७१८४१/जुवाटकर, ०८११८७/वेडगे, पो.शि.११३७१२/शिंदे, १३०३७५/केळकर, १७१०६७/ठाणेकर व चालक पो.शि. ३१७००१/सालके यांनी पार पाडली आहे.

## शून्य मानवी हस्तक्षेपात परिवहन विभागाच्या १५५ मोटार वाहन निरीक्षकांच्या ऑनलाईन बदल्या



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, मुंबई :** परिवहन विभागातील बदली प्रक्रियेत पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचा नवा आदर्श निर्माण करत १५५ मोटार वाहन निरीक्षकांच्या शून्य मानवी हस्तक्षेप असलेल्या ऑनलाईन बदली प्रक्रिया परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आल्या.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली २०२२ पासून परिवहन विभागात ऑनलाईन बदली प्रक्रिया राबविण्यात येत आहे. बदली प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप, लाचखोरी किंवा भ्रष्टाचाराला थारा मिळू नये, यासाठी शासन कटीबद्ध आहे. यंदा आयआयटी मुंबईच्या तज्ज्ञांनी विकसित केलेल्या अत्याधुनिक सॉफ्टवेअरच्या माध्यमातून १५५ मोटार वाहन निरीक्षकांच्या बदल्या पूर्णपणे संगणकीकृत आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात आल्या.

भविष्यात परिवहन विभागातील इतर अधिकाऱ्यांच्या बदल्याही याच प्रणालीद्वारे करण्यात येणार असून, त्यामुळे बदली प्रक्रियेवरील विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# फिजिओथेरपिस्ट महिला डॉक्टरचा औषधांचा ओव्हरडोज झाल्याने मृत्यू

*** सप्तशृंगी मंदिर चनकापूर परिसरातील घटना**



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** चनकापूर परिसरातील सप्तशृंगी मंदिर वॉर्ड क्रमांक १ मध्ये राहणाऱ्या एका ४४ वर्षीय महिला फिजिओथेरपिस्ट डॉक्टरचा औषधांचा ओव्हरडोज घेतल्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना २७ जून शनिवारला समोर आली आहे त्यामुळे खापरखेडा परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

डॉ. शुभांगी बाळकृष्ण वाघ (४४) सप्तशृंगी मंदिर, वार्ड क्रमांक १ चनकापूर खापरखेडा असे मृत महिलेचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार डॉ. शुभांगी वाघ या विवाहित होत्या. मात्र, मागील २० वर्षांपासून त्या चनकापूर येथे आपले वडील बाळकृष्ण वाघ यांच्या घरीच राहत होत्या. डॉ. शुभांगी या गेल्या काही काळापासून मानसिक आजाराने त्रस्त होत्या. त्यांच्यावर उपचार सुरू होते. मानसिक त्रास जास्त वाढल्यास डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्यांपेक्षा अधिक प्रमाणात गोळ्या घेण्याची सवय होती.

२६ जूनच्या रात्री नेहमीप्रमाणे त्या औषधांच्या गोळ्या खाऊन झोपल्या होत्या. दुसऱ्या दिवशी २७ जून रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास कुटुंबीयांनी त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. नेहमीप्रमाणे औषधांचा जास्त डोज घेतला असावा असे समजून सुरुवातीला कुटुंबीयांनी फारसे गांभीर्य घेतले नाही. परंतु दुपार पर्यंत त्यांच्यात काहीच हालचाल न दिसल्याने कुटुंबीयांनी शेजाऱ्यांच्या मदतीने त्यांना तातडीने उपचारासाठी नागपूर येथील शासकीय मेयो रुग्णालयात नेले मात्र डॉक्टरांनी तपासून डॉ. शुभांगी यांना मृत घोषित केले.

मृतक डॉ. शुभांगी यांचे वडील खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातील सेवानिवृत्त कल्याण अधिकारी तर आई महाराष्ट्र विद्यालयाच्या सेवानिवृत्त शिक्षिका आहेत. २७ जून शनिवारला डॉ शुभांगी यांच्या आईची प्रकृती ठीक नसल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र अशातच डॉ असलेल्या तरुण मुलीचा याप्रकारे अंत झाल्याने वाघ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

औषधांचा डोस जास्त झाल्यामुळेच डॉ. शुभांगी यांचा मृत्यू झाला असावा, अशी प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे. याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल पुढील तपास सुरू आहे.

# भूमी अभिलेख कार्यालयाचा अजब कारभार सरकारी खुर्चीवर खाजगी व्यक्ती विराजमान

अभिलेख कक्ष ही उघडाच संपूर्ण तालुक्यातील जमिनीचे दस्तावेज असलेला महत्वपूर्ण अभिलेख कक्षाचे दारही रविवारी उघडे दिसले या बाबत विचारले असता जगताप म्हणाले की, त्या कक्षाची चावी टेबलावरच पडलेली असते.

**लाईट, पँखेही चालूच...**

जगताप व त्यांच्या सोबतच्या तीन खाजगी व्यक्ती ह्या एकाच टेबलवर समोरासमोर बसून काम करत असताना संपूर्ण कार्यालयातील पंखे, ट्युबलाईट सुरू होत्या आणि जगताप हे लघुशंके साठी कार्यल्याबाहेरील मोकळ्या जागेत जाऊन मोकळे होऊन आले. त्यामुळे मोदींच्या स्वच्छ भारत मिशनला सरकारी कर्मचारीच हरताळ फास्ट असल्याचे दिसून आले.



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२९, जिंतूर :** शहरातील तहसील कार्यलयाच्या आवारात असलेल्या भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी बेजबाबदार पणाचा कळस गाठला असून यांना म्हणे कार्यालयीन कामासाठी ५ दिवस पुरेना म्हणून रविवारी सुट्टीच्या दिवशीही चक्क कार्यालय उघडून सरकारी खुर्चीवर खाजगी माणूस बसवून कसलेतरी कामे करत बसल्याचे पत्रकारांना आढळून आले या बाबत जाब विचारताच खाजगी इसमानी पळ काढला.

तर जगताप यांच्या सोबतच्या खाजगी इसमाने कार्यालयास कुलूप लावले ही घटना रविवार दि.२८ जून रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली याबाबत अधिक माहिती अशी की शहरातील भूमी अभिलेख कार्यालय नेहमीच या ना त्या कारणाने चर्चेत असते या कार्यालयास प्रभारी अधिकारी असल्याने व ते कार्यालयाकडे जास्त लक्ष देत नसल्याने कर्मचाऱ्यांची मनमानी वाढली असून कर्मचारी कामानिमित्त कार्यालयात आलेल्या शेतकरी, नागरिकांना उद्धट भाषेत बोलत असल्याच्या असंख्य तक्रारी आहेत.काही दिवस अगोदर शहरातील एक विधिज्ञानेही या कार्याल्याचा व्हिडीओ बनवून समाज माध्यमावर टाकले होते त्यामुळे या विभागाच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली होती. गेलेली अब्रू परत मिळवण्यासाठी कार्यालयातील एका प्रमुख अधिकाऱ्याने सगळ्या कर्मचाऱ्यांना वेठीस धरून त्या विधिज्ञ विरुद्ध महसूल व पोलीस स्थानकात निवेदन देण्यास भाग पाडले असे असले तरीही हे कर्मचारी किती निष्टेने नागरिक व शेतकऱ्यांचे कामे करतात हे संपूर्ण तालुक्यातील जनतेला माहीत आहे रविवार दि.२८ जून रोजी दुपारी एक वाजल्यापासून भूमी अभिलेख कार्यालय उघडे असल्याची माहिती पत्रकारांना मिळाली त्यावरून दोन वाजण्याच्या सुमारास शहरातील काही पत्रकार बांधव कार्यालयात गेले असता त्या ठिकाणी भु मापक प्रकाश जगताप यांच्या बाजूच्या सरकारी खुर्चीवर हिंगोली येथील खाजगी व्यक्ती प्रमोद देशमुख हे बसून लॅपटॉप वर कसलेतरी काम करतांना दिसून आले तर टेबल च्या दुसऱ्या बाजूला जगताप यांचे आणखीन एक मित्र काळे हे आणि कार्यालयातून बदलुन गेलेले प्रधान हे ही खुर्चीवर बसलेले आढळून आले या वेळी पत्रकारांनी स्वतःचा परिचय देत जगताप यांना सरकारी टेबल खुर्चीवर खाजगी माणूस बसून काय करतो...? असे प्रश्न विचारताच ते मला मदत करायला आले जगताप म्हणाले.

कोणत्या नागरिकांचे सरकारी काम सुट्टीच्या दिवशी आपण करत आहात असे प्रश्न विचारताच खाजगी व्यक्ती प्रमोद पाटील यांनी लॅपटॉप बंद केला व आम्ही सहज बसलो होतो असे म्हणून वेळ निभावून नेण्याचा प्रयत्न केला पत्रकारांनी व्हिडीओ शूटिंग सुरू करताच प्रमोद देशमुख,प्रधान यांनी कार्यालयातून पोबारा केला.

तर जगताप म्हणाले की आम्हाला कामासाठी पाच दिवस पुरत नसल्याने आम्ही सुट्टीच्या दिवशी काम करीत बसलो होतो तर पत्रकार आल्यानंतर आपण काम का बंद केले असे विचारताच लघुशंकेचे कारण दाखवत जगताप यांनीही कार्यालयातून काढता पाय घेतला व खाजगी व्यक्ती काळे यांनी भूमी अभिलेख कार्यलयाच्या दाराला कुलूप लावले त्यामुळे या कार्यालयाची चावी खाजगी व्यक्ती कडे कशी असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

**या सर्व प्रकाराबाबत चौकशी करतो - उपअधीक्षक गोरे**

या सर्व प्रकाराबाबत प्रभारी भूमी उपअधीक्षक गोरे यांच्याशी भ्रमध्वनी द्वारे संपर्क साधला असता ते म्हणाले की, काम असल्याने सुट्टीच्या दिवशी कार्यालय उघडले असेल परंतु सरकारी टेबल खुर्चीवर बसून खाजगी व्यक्ती लॅपटॉप का हाताळतेय..? या प्रश्नाचे उत्तर देणे टाळत त्यांनी चौकशी करून सांगतो असे म्हणाले.

# जिवलग मित्राच्या निधनाचा धक्का असह्य, काही तासांतच दुसऱ्या मित्रानेही सोडले प्राण!



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२९, विंचूर (नाशिक) :**'मित्र' आणि 'मैत्री' या शब्दाची व्याख्या शब्दांत सांगणे कठीण असते, मात्र विंचूर (ता. निफाड) येथे मैत्रीची एक अत्यंत दुर्दैवी, हृदयद्रावक आणि तितकीच अंगावर काटा आणणारी घटना घडली आहे.

दोन परममित्रांपैकी एकाचा सकाळी हृदयविकाराने मृत्यू झाला, तर जिवलग मित्राच्या मृत्यूचा हा प्रचंड धक्का सहन न झाल्याने अवघ्या काही तासांतच दुसऱ्या मित्राचीही प्राणज्योत मालवली. अनिल चव्हाण आणि मनोज पुखराज सोनी अशी या दोन्ही जिवलग मित्रांची नावे असून, त्यांच्या या अकस्मात जाण्याने संपूर्ण विंचूर परिसरावर शोककळा पसरली आहे.

**...आणि काळाने घाला घातला**

मिळालेल्या माहितीनुसार, विंचूर येथील रहिवासी अनिल चव्हाण यांना आज सकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. ही बातमी त्यांचे परममित्र मनोज पुखराज सोनी यांना समजताच त्यांना प्रचंड धक्का बसला. ते तातडीने मित्राच्या घरी पोहोचले. आपल्या जिवलग मित्राचे ते निष्प्राण आणि अचेतन कलेवर पाहून मनोज यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांना अश्रू अनावर झाले होते.

**दुःख मनातच गिळले, पण...**

मित्र अनिल यांच्या अंत्यविधीपासून ते सर्व विधी आटोपेपर्यंत मनोज तेथेच उपस्थित होते. त्यांना ओक्साबोक्शी रडून मनातील दुःख हलके करायचे होते, मात्र त्यांनी आपल्या भावनांवर ताबा ठेवत ते अथांग दुःख मनातच गिळले. अंत्यसंस्कार आटोपून लोक घरी परतल्यानंतर मनोज हे जड अंतःकरणाने आपल्या दुकानात गेले.

**काही तासांतच मित्राच्या मागे प्रयाण**

मनोज पुखराज सोनी हे शरीराने दुकानात गेले असले तरी, मनातून ते जिवलग मित्राच्या जाण्याच्या धक्क्यातून सावरू शकले नव्हते. सायंकाळी चार ते सव्वाचार वाजेच्या सुमारास, मित्राच्या विरहाचे दुःख असह्य झाल्याने मनोज यांनाही हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

सकाळी एका मित्राचा अंत्यविधी झालेला असताना, सायंकाळी दुसऱ्या जिवलग मित्राचाही त्याच कारणाने मृत्यू झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. या घटनेने संपूर्ण विंचूर शहर आणि दोन्ही कुटुंबीय दुःखसागरात बुडाले आहेत. हेच का ते खरं मित्राचं प्रेम? अशी चर्चा आता विंचूरमध्ये अत्यंत जड अंतःकरणाने सुरू आहे. या दोन्ही जिवलग मित्रांना संपूर्ण गावाने अत्यंत भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# शिवाजीनगरचा अरिहंत पवार भारतीय सेनेत दाखल



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, उंब्रज :** शिवाजीनगर,ता. कराड येथील अरिहंत विष्णू पवार याची भारतीय सेनेत निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि देशसेवेची जिद्द यांच्या बळावर अरिहंतने हे यश संपादन केले असून त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.अरिहंतने प्राथमिक शिक्षण शिवाजीनगरच्या जिल्हा परिषद शाळेत तर पुढील माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण हे उंब्रज येथील महात्मा गांधी विद्यालय व कराड येथील सद्गुरु गाडगे महाराज विद्यालयात झाले. गांधी विद्यालयात पूर्ण केले.पुढे स्वामी विवेकानंद करिअर अकॅडमी, काशीळ येथे सैन्य भरतीचे विशेष प्रशिक्षण घेत असताना त्याने अथक मेहनत घेतली आणि अखेर भारतीय सेनेत निवड होण्याचे स्वप्न साकार केले. अरिहंत हा कोल्हापूर येथे भरती झाला. त्यानंतर १५ जानेवारी रोजी सुरू झालेले भरतीपूर्व प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर तो प्रथमच शिवाजीनगर येथे येताच ग्रामस्थांनी आप्तस्वकियांनी त्याचे ढोल ताशांच्या गजरात जोरदार स्वागत केले.अरिहंत हा ज्येष्ठ नागरिक रामचंद्र सिताराम पवार यांचा तो नातू तर माजी उपसरपंच दत्तात्रय लक्ष्मण पवार यांचा पुतण्या आहे.अरिहंतचे वडील विष्णू रामचंद्र पवार हे शेती करतात. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही मुलाच्या शिक्षणाला आणि ध्येयपूर्तीसाठी सातत्याने पाठबळ दिले. त्यांच्या त्यागाचे आणि आई-वडिलांच्या संस्कारांचे हे फळ असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.अरिहंतच्या यशामुळे शिवाजीनगरसह परिसरातील युवकांना नवी प्रेरणा मिळाली आहे. देशसेवेचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांनी जिद्द, शिस्त आणि सातत्य यांच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे अरिहंतने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे.त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक संघटनांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्याच्या उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# वन भोजनातून जलसंधारण कामाच्या समाधानाची तृप्ती; आम्ही टाकळीकरांच्या जलसंधारण कामाची यशस्वी सांगता

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** पावसाळी वातावरणातील थंड हवेतील आल्हादायक गारवा... त्यात घरच्या डब्यांमधील विविध व्यंजनांचा घमघमाट.. विविध प्रकारच्या चटण्या.. लोणची... झणझणीत लाल - हिरव्या मिरच्यांचा ठेचा.. तोंडी लावायला कांदा, लसूण, लिंबू, काकडीच्या फोडी...अन् ताज्या गावरान आंब्याचे पाड - जांभळांची स्वीट डिश... पंचतारांकित हॉटेलच्या महागड्या मेनूला फिकी पाडणारी असल गावरान फक्कड मेजवानी व सोबतीला निसर्गाच्या सानिध्यात जल अभिनयाच्या गप्पांची मैफील जमल्यावर आपोआप सर्वांची ब्रम्हानंदी टाळी लागली. निमित्त होते आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानने नाम फाऊंडेशनसह विविध संस्थांच्या सहयोग व लोकसहभागातून राबविलेल्या जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याच्या यशस्वी सांगता पाहणी प्रसंगी आयोजित केलेल्या वन स्नेहभोजनाची आम्ही टाकळीकर ग्राम विकास प्रतिष्ठानचे संस्थापक, पत्रकार चाँद शेख यांनी जल अभियानाचे विवेचन करताना वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या सामाजिक प्रकल्पांची माहिती देत शिक्षण, आरोग्य व जलसंवर्धन या त्रिसूत्रीवर ग्राम विकासाची चळवळ आम्ही टाकळीकर राबवत असल्याचे सांगितले.



यावेळी आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा पुणे नोबेल हॉस्पिटलचे वरिष्ठ संचालक डॉ.बाळासाहेब बांडे, शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले, सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब खिलारी, आम्ही टाकळीकरचे स्थानिक समन्वयक संतोष सोनवळे, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, उपसरपंच रामभाऊ तराळ, ग्रा. पं. सदस्य दत्तात्रय निवडुंगे, प्रताप खिलारी, संदीप खिलारी, मेजर दिगंबर शेळके, आदिनाथ पायमोडे, मंगेश खिलारी, दादाभाऊ नवले, संदीप झावरे, आनंदा झरेकर, श्रावण गायकवाड, प्रा. किसन पायमोडे, नानासाहेब झावरे, रविंद्र पायमोडे, पत्रकार वसंत रांधवण, संजय कुसकर, दादा निवडुंगे, राहुल धुमाळ, नितीन धुमाळ, महेश धुमाळ, शिवाजी कोरडे, सचिन बांडे, महेश ठाणगे, जालिंदर बांडे, संकेत थोपटे, दीपक ढूस, गणेश चव्हाण, शुभम गुंदेचा, कृष्णा बांडे, सागर थोपटे, संजय झावरे, अतुल सैद, नितीन ढोकळे, विष्णू बद्रे, नितीन ढोकळे, बाबाजी कासुटे आदींसह युवक, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पुढील वर्षीच्या कामाला मंजुरी**

नाम फाऊंडेशन, टाटा मोटर्सने टाकळी ढोकेश्वर येथे आम्ही टाकळीकरच्या माध्यमातून झालेल्या यशस्वी जल अभियानामुळे प्रभावित होऊन पुढच्या वर्षी मार्चमध्येच या कामांना पुन्हा मंजुरी दिली असून राज्य शासनाच्या माध्यमातून या अभियानास सर्व मदत मिळणार असल्याची माहिती नाम फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक विशाल नगरे व टाटा मोटर्सचे जिल्हा समन्वयक प्रसाद जाधव यांनी यावेळी दिली.

**लोकसहभागातूनच घडेल जलक्रांती**

राळेगणसिद्धी व हिवरे बाजार या आपल्या शेजारच्या गावांनी पाण्याचे महत्त्व जाणून जलसंवर्धन केल्याने या गावांचा केवळ पाणी प्रश्न सुटला नसून त्यांची जागतिक पातळीवर नोंद झाली आहे. भविष्यात पुढील संघर्ष हा राजकीय नसून पाण्यावरून होणार आहे. त्यामुळे ही गंभीर बाब लक्षात घेऊन सर्वांनी पाण्याचे महत्व ओळखावे. यासाठी स्थानिक नागरिकांमध्ये जलसाक्षरता निर्माण होणे आवश्यक आहे. लोकसहभागातूनच जलक्रांती घडेल, असा विश्वास आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब बांडे यांनी यावेळी व्यक्त केला.

**८ कोटी लिटर पाणीसाठा**

सलग ३५ दिवस हे जल अभियान राबविले गेल्यामुळे निवडुंगेवाडी तलावात साडेपाच कोटी व ओढ्यावरील चार बंधाऱ्यात अडीच कोटी असा एकूण आठ कोटी लिटर पाणीसाठा होणार असून यामुळे परिसरातील पाणी पातळीत वाढ होईल, अशी माहिती पाटबंधारे विभागाचे निवृत्त अभियंता सूर्यभान भालेकर यांनी यावेळी दिली.

**नाना पाटेकर - मकरंद अनासपुरे प्रभावित**

नाम फाऊंडेशनच्या मदतीने आम्ही टाकळीकरने राबविलेल्या सलग ३५ दिवसांच्या जल अभियानाने नामचे सर्वेसर्वा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे प्रचंड प्रभावित झाले असून लवकरच या कामाला भेट देण्याचे त्यांनी आश्वासित केले आहे.

**३५ दिवस अविरत अभियान**

आम्ही टाकळीकरने विविध संस्थांच्या सहयोगातून व लोकसहभागातून तब्बल ३५ दिवस हे जल अभियान राबविले. या अभियानात स्थानिक धुमाळ वस्ती व निवडुंगेवाडी येथील युवक शेतकऱ्यांनी हिरारीने सहभाग घेत रोज कामावर हजेरी लावत हे अभियान यशस्वी पार पाडले.

**जमा खर्चाचा ताळेबंद**

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानने या जलसंधारण कामासाठी निधी देणाऱ्या देणगीदारांच्या नावासह या कामावर झालेल्या खर्चाचा ताळेबंद मांडणारा फलक गावाच्या वेशीसमोरील पारावर व मुख्य चौकात लावला आहे. यापुढेही प्रत्येक प्रकल्पाचा ताळेबंद व देणगीदारांचा फलक लावण्यात येणार आहे.

**सुजित झावरे यांची भेट**

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी जलसंधारण कामास भेट देऊन पाहणी करत लोकसहभागातून होत असलेल्या या अभियानाचे कौतुक करताना आम्ही टाकळीकरच्या प्रत्येक प्रकल्पास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या समवेत विक्रम झावरे, लहू जाधव, अंकुश पायमोडे, संकेत झावरे, अमोल साळवे, के. बी. बांडे, मळीभाऊ रांधवण, बबलू खिलारी आदी उपस्थित होते.

# ‘नशामुक्त नवी मुंबई’ मोहिमेला बळ

## ५६.६९ कोटींचे अंमली पदार्थ नष्ट, २ दिवसांत ५ हजार विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२९, नवी मुंबई :** जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना’चे औचित्य साधत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने ‘नशामुक्त नवी मुंबई’ अभियानांतर्गत सुमारे ५६ कोटी ६९ लाख ५५ हजार १९२ रुपये किमतीचा जप्त अंमली पदार्थांचा साठा कायदेशीर प्रक्रियेनुसार नष्ट केला. अंमली पदार्थांच्या अवैध साखळीवर प्रहार करण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची कारवाई मानली जात आहे.

तळोजा येथील शासनमान्य मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीच्या प्रकल्पात जप्त अंमली पदार्थांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दिपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे आणि गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ उपस्थित होते. पोलीस आयुक्तालयाच्या माहितीनुसार, ‘नशामुक्त नवी मुंबई’ अभियानांतर्गत आतापर्यंत १६६ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून, त्यामधून जवळपास ५७ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या मोहिमेअंतर्गत २६ गुन्ह्यांमधील जप्त अंमली पदार्थांची यावेळी विल्हेवाट लावण्यात आली. कारवाईबरोबरच जनजागृतीवरही भर देण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसांत शहरातील २५ शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या उपक्रमातून सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या व्यसनाचे दुष्परिणाम आणि त्यापासून दूर राहण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांकडून अंमली पदार्थांच्या व्यवहाराबाबत गोपनीय माहिती मिळावी यासाठी ८८२८-११२-११२ हा विशेष हेल्पलाईन क्रमांकही सुरू करण्यात आला आहे. माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, अशी ग्वाही पोलिसांनी दिली आहे. अंमली पदार्थांविरोधातील मोहीम आगामी काळात अधिक तीव्र करण्यात येणार असून, नागरिकांनी निर्भयपणे माहिती देऊन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केले.

# नवी मुंबईत पाण्याचा लपंडाव

## पाणीटंचाई टाळण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना राबवा - समाजसेवक मढवी

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२९, जुईनगर (नवी मुंबई) :** नवी मुंबईत यंदा पावसाने अद्याप अपेक्षित हजेरी लावलेली नसल्याने पाणीपुरवठ्याबाबत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेने प्रत्येक प्रभागात आठवड्यातील दोन दिवस एका वेळेचा पाणीपुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या निर्णयामुळे नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात वाढली असून, दुसऱ्या दिवशीच नव्हे तर तिसऱ्या दिवशीही पाण्यासाठी नागरिकांची धावपळ सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

जुईनगरचे समाजसेवक श्रीधर मढवी यांनी या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनावर टीका केली आहे. त्यांच्या मते, पाणी बचतीसाठी अनेक प्रभावी उपाय उपलब्ध असतानाही त्यांची अंमलबजावणी करण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. त्यामुळे आज



पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर बनले आहे.

मढवी यांनी सांगितले की, मागील वर्षीच त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आणि तत्कालीन प्रशासनातील वरिष्ठांना भविष्यातील पाणीटंचाईबाबत सावध करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. जर त्यावेळी गळती रोखणे, पाण्याचा अपव्यय थांबवणे आणि वितरण व्यवस्था सुधारण्यावर भर दिला असता, तर आज ऑगस्टच नव्हे तर डिसेंबरपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा उपलब्ध राहिला असता. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आज नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले.

**मढवी यांच्या मते, पाणी वाचवण्यासाठी पुढील उपाय तातडीने राबविणे आवश्यक आहे :-**

१) प्रत्येक अधिकृत तसेच अनधिकृत नळजोडणीवर पाण्याचे मीटर बसविणे बंधनकारक करावे.

२) प्रत्येक जोडणीला बॉल कॉक प्रणाली बसवून टाकी भरल्यानंतर पाणी आपोआप बंद होईल, अशी व्यवस्था करावी, जेणेकरून पाण्याचा अपव्यय टळेल.

३) पाणीटंचाई असताना नवीन बांधकामांना परवानगी देण्यावर नियंत्रण आणावे.

४) पाईपने गाड्या धुणे, घराबाहेरील अनधिकृत नळजोडण्यांतून पाण्याचा अपव्यय आणि रात्री होणारी पाण्याची उधळपट्टी रोखण्यासाठी कठोर कारवाई करावी.

५) अनधिकृतरीत्या पंप लावून पाणी खेचणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, कारण त्यामुळे इतर नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होत नाही.


६) ज्या गृहनिर्माण संस्थांना अद्याप व्यावसायिक दराने पाणीबिल आकारले जाते, त्या प्रकरणांचा पुनर्विचार करून योग्य दर लागू करावेत. त्यामुळे पाणीवापराचे नियोजन अधिक प्रभावी होऊ शकते.

मढवी यांनी स्पष्ट केले की, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी केवळ पाणीपुरवठा कमी करणे हा उपाय नाही. गळती रोखणे, अपव्यय थांबवणे, अनधिकृत जोडण्यांवर कारवाई करणे आणि आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे. नागरिकांनाही पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. सध्या नवी मुंबईतील अनेक भागांमध्ये नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, प्रशासनाने तातडीने दीर्घकालीन आणि प्रभावी उपाययोजना राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडूनही जोर धरू लागली आहे.

# थोडक्यात

## माथेरानच्या पत्रकाराची लेखणी ठरली गौरवास पात्र

### चंद्रकांत सुतार यांना मुंबईत 'निर्भीड पत्रकारिता पुरस्कार'



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, माथेरान :** माथेरानचे दैनिक अक्षराज चे प्रतिनिधी पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सुतार यांची निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि समाजाभिमुख पत्रकारितेची दखल घेत त्यांना ‘निर्भीड पत्रकारिता पुरस्कार’ जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार आर्यारवी एंटरटेनमेंटतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ‘पत्रकार व संपादक सन्मान सोहळ्या’मध्ये प्रदान करण्यात येणार असून, त्यांच्या निवडीमुळे माथेरानच्या पत्रकारितेच्या क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. समाजाचा आरसा म्हणून काम करणाऱ्या आणि कोणत्याही परिस्थितीत सत्याची बाजू निर्भीडपणे मांडणाऱ्या पत्रकार, समाजसेवक आणि कलावंतांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने अभिनेते, दिग्दर्शक व पत्रकार महेश्वर भिकाजी तेटांबे यांच्या संकल्पनेतून हा भव्य सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मुख्य प्रवाहातील माध्यमांसह ग्रामीण भागातील मुक्त वार्ताहर, साप्ताहिक-पाक्षिकांचे प्रतिनिधी तसेच डिजिटल न्यूज पोर्टलच्या संपादकांनाही या व्यासपीठावर सन्मानित करण्यात येणार आहे.

या सोहळ्यात 'स्वाभिमान लेखणी', 'शब्दवेध गौरव', 'अजेय लेखणी', 'कलम-रत्न', 'कलागौरव', 'साहित्य-संस्कृती जीवनगौरव', 'विवेक-दीप', 'जनसेवा रक्षक' आणि 'निर्भीड पत्रकारिता पुरस्कार' अशा विविध मानाच्या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

पुरस्कार वितरण समारंभ रविवार, १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.०० या वेळेत सुरेंद्र गावस्कर हॉल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर (पूर्व), मुंबई येथे पार पडणार आहे. यावेळी जगप्रसिद्ध बोलके बाहुलाकार व जादूगार श्रीधर कीर, प्रा. विसुभाऊ बापट, कवी व साहित्यिक अरुण म्हात्रे, साहित्याचार्य व ज्येष्ठ संपादक पंढरीनाथ तामोरे, ज्येष्ठ पत्रकार गुरुनाथ तिरपणकर, ॲड. सुनील शिर्के आणि समाजसेवक कृष्णा बाळू काजरोळकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या सन्मान सोहळ्यास पत्रकार, साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने राहुल खरात आणि केतन भोज यांनी केले आहे.

## चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२८, चारठाणा (परभणी) :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत चारठाणा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दिनांक २८ जून २०२६ रोजी लसीकरण मोहिमेचा शुभारंभ उत्साहात पार पडला. जिल्हा परिषद सदस्या सरुबाई शंकर जाधव यांच्या हस्ते बालकांना पोलिओ लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेला सुरुवात करण्यात आली. यावेळी पंचायत समिती सदस्या तहेसीन देशमुख, सरपंच अनिरुद्ध चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य मधुकर भवाळे, सलीमभाई काजी, कैलास महाराज देशमुख, बाबासाहेब म्हेत्रे, माजेद देशमुख, बाळू घाटुळ आणि नानासाहेब निकाळजे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

वैद्यकीय अधिकारी डॉ.विवेकानंद खांडरे व डॉ.विश्वनाथ कळाकादू यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेविका सुनंदा पवार, जया मंडलीक, सोनाली काढबोंडे, दीपमाला पाटेकर, सीमा सातपुते, द्वारकाबाई थोरात तसेच मनोज डोक, उमलाकर पोवळे, ज्ञानेश्वर हातेकर, भारत किरवले, रामेश्वर बांगकर, शाम रणमले, अविनाश रणमले, सोमनाथ खके, वैजनाथ मुंजे, नामदेव मुसळे आणि आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मोहिमेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. यावेळी आरोग्य कर्मचाऱ्यांनी पालकांना पोलिओ लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगत, दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी हा संदेश दिला. भारत पोलिओमुक्त असला तरी शेजारील देशांमधील संभाव्य धोका लक्षात घेता ५ वर्षांखालील प्रत्येक बालकाला प्रत्येक राष्ट्रीय मोहिमेत पोलिओचा डोस देणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.

## बोरीत निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप

**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२९, बोरी (परभणी) :** बोरी येथे सोमवार, दि.२९ जून २०२६ रोजी निराधार योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. निराधार योजना समितीचे सदस्य गजानन चौधरी यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमाला लाभार्थी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सतीशराव चौधरी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून निराधार योजना समितीचे तालुका अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे उपस्थित होते. यावेळी उपसभापती यशवंतराव चौधरी, बाबुभाई काझी, आशोबा कनकुटे, व्यापारी संघाचे अध्यक्ष संतोषराव चौधरी, मंडळ अध्यक्ष अशोक शिंपले, ओमकार चौधरी, मुंजाभाऊ गोरे, संतोषराव माने, अंकुश बकान, रामेश्वर पोंदाळ आणि मंचकराव चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी आयोजक व निराधार समितीचे सदस्य गजानन चौधरी यांनी प्रास्ताविक करून योजनेचा उद्देश आणि लाभार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांची माहिती दिली. त्यानंतर डॉ. पंडितराव दराडे यांनी उपस्थित नागरिकांना निराधार योजनेच्या अटी, पात्रता आणि शासकीय लाभांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप सतीशराव चौधरी यांनी केला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राम चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर राठोड, तानाजी चौधरी, दीपक कनकुटे आणि सुभाष वाळवंटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**जिंतूर तालुक्यात ४५५ अर्जांना मंजुरी**

जिंतूर तालुक्यातील विविध गावांमधील गरजू, निराधार व पात्र नागरिकांच्या एकूण ४५५ अर्जांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती निराधार योजना समितीचे तालुका अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे यांनी दिली.

**दिव्यांग व महिलांच्या प्रकरणांना प्राधान्य**

बोरी व परिसरातील निराधार योजनेच्या कामकाजात पहिल्या टप्प्यात दिव्यांग, अपंग बांधव आणि गरजू महिलांच्या प्रकरणांना प्राधान्याने मंजुरी देण्यावर भर दिला जात असल्याची माहिती निराधार समितीचे सदस्य गजानन चौधरी यांनी दिली. त्यांनी पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले